REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2024

# शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये पिक विमा योजनेचे योगदान विशेष संदर्भ: यवतमाळ जिल्हा (कालखंड: इ.स. २०१६-२०१७ ते २०२०-२१)

प्रा. अजय विलासराव तगलपल्लेवार१ , डॉ. दीपक भास्करराव कुटे
१संशोधनकर्ता , एम.ए. (अर्थशास्त्र), सेट
२मार्गदर्शक , सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र)
कला आणि वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब, ता. दारव्हा, जि. यवतमाळ.

**सारांश**

आपले आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पिक विमा योजनेची मदत घेतली पाहिजे. आज शेतकरी पिक विमा योजनेकडे वळू लागला आहे. तेव्हा या पिक विमा योजनेमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत किंवा उन्नतीमध्ये कशा पद्धतीने सुधारणा होत आहे हे शोधण्याचा प्रयत्न संशोधनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे पिक विमा योजना कशाप्रकारे शेतकऱ्यांना फायदेशीर ठरेल आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत कशाप्रकारे सुधारणा होऊ शकते हे पाहण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.



प्रस्तुत संशोधनात यवतमाळ जिल्ह्यातील पिक विमा योजनेचे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये योगदान शोधण्याचे ठरविले आहे संबंधीतविषयानुसार आजवर यामध्ये काही थोड्या प्रमाणात काम झाले आहे. त्या कामाला पूर्णतः संशोधन स्वरूप नसून माहिती संकलन व सादरीकरण एवढ्यापुरतीच त्यांची व्याप्ती राहिलीआहे. त्यामुळे त्या कार्याचे महत्वही तेवढेच मर्यादित झालेले आहे. तेव्हा सदर विषयावर व्यापक स्वरुपात संशोधन होणे गरजेचे आहे ही गरज ओळखता शास्त्रशुद्ध संशोधन पद्धतीने या विषयाचे अध्ययन करून नव्याने मांडणी करण्याची आवश्यकता आहे म्हणून झालेले कार्य पुन्हा तपासण्याचे, परीक्षण करण्याचे, सत-सत्यता तपासण्याची गरज असल्याने प्रस्तुतशोधनिबंधाचे कार्य हाती घेतले आहे

**प्रस्तावना:**

पीक विमा योजना नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांसारख्या विविध संकटांमुळे पिकांच्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण देऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात ही प्रस्तावना शेतकऱ्यांच्या उपजीविकेला आधार देण्यासाठी आणि कृषी स्थिरता आणि वाढीला चालना देण्यासाठी पीक विम्याचे महत्त्व अधोरेखित करते. अलिकडच्या वर्षांत, कृषी क्षेत्राला अप्रत्याशित हवामानापासून ते बाजारातील चढ-उतारांपर्यंत असंख्य आव्हानांचा सामना करावा लागला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या आजीविकेला महत्त्वपूर्ण जोखीम निर्माण झाली आहे. यवतमाळ जिल्हा, भारताच्या महाराष्ट्रातील विदर्भात वसलेला, या आव्हानांचे प्रतीक आहे. हा जिल्हा, प्रामुख्याने कृषीप्रधान, पावसावर अवलंबून असलेल्या शेतीवर अवलंबून असल्याने आणि पीक अपयशास बळी पडल्यामुळे कृषी संकटाला बळी पडतो. या आव्हानांच्या प्रकाशात, सरकार आणि धोरणकर्त्यांनी विविध हस्तक्षेपांद्वारे शेतकऱ्यांना भेडसावणारे धोके कमी करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यापैकी एक म्हणजे पीक विमा योजनांची अंमलबजावणी. पीक विमा योजना ही नैसर्गिक आपत्ती, कीड, रोग आणि पीक उत्पादनावर परिणाम करणाऱ्या इतर अनपेक्षित घटनांमुळे होणाऱ्या नुकसानीपासूनशेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. २०१६-२०१७ ते २०२०-२१ या कालावधीत व्याप्ती, पारदर्शकता आणि कार्यक्षमता सुधारण्याच्या उद्देशाने

प्रधान मंत्री फसल विमा योजना (PMFBY)सोबत भारतातील पीक विमा योजनांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा झाल्या आहेत. यवतमाळ जिल्हा, एक प्रमुख कृषी केंद्र असल्याने, शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासावर या पीक विमा योजनांची परिणामकारकता आणि परिणामांचे मूल्यांकन या अध्ययनात केले गेले आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये पिक विमा योजनेचे काय योगदान आहे याचे अध्ययन या संशोधनात करण्यात आले आहे.

प्रतिकूल हवामान, कीटकांचा प्रादुर्भाव आणि बाजारातील चढउतार यांसोबत, शेतकऱ्यांच्या नियंत्रणाबाहेरील जोखमींसाठी शेती स्वाभाविकपणे असुरक्षित आहे. पीक विमा पिकांच्या नुकसानीची भरपाई देऊन हे धोके कमी करण्यास मदत करतो, ज्यामुळे शेतकऱ्यांना संभाव्य आर्थिक नासाडीपासून संरक्षण मिळते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे रक्षण करून, पीक विमा कृषी क्षेत्रात स्थिरता आणि लवचिकता वाढवतो. पीक विम्याचा प्रवेश शेतकऱ्यांना आधुनिक कृषी पद्धती आणि तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करतो ज्यामुळे उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढते. जेव्हा शेतकऱ्यांना पीक अपयशी झाल्यास नुकसान भरपाईची हमी दिली जाते, तेव्हा ते नाविन्यपूर्ण तंत्रांचा अवलंब करण्यास, उच्च-गुणवत्तेचे बियाणे खरेदी करण्यास आणि खते व कीटकनाशके यांसारख्या निविष्ठांचा विवेकपूर्वक वापर करण्यास तयार असतात. यामुळे सुधारित उत्पन्न आणि एकूणच कृषी उत्पादकता वाढते आणि आर्थिक विकासाला हातभार लागतो.

**सारणी क्रमांक १ : यवतमाळ जिल्ह्यातील पिक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांचा कालांतराने कृषिउत्पादनात वाढ किंवा घट होण्यासंबंधीप्रतिसाद**

| **प्रतिक्रिया** | **लाभार्थी शेतकरी** | | **बिनलाभार्थी शेतकरी** | |
|---|---|---|---|---|
| | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** |
| वाढ झाली | ४१ | २५.६ | १३ | ८.१ |
| घट झाली | ८२ | ५१.३ | ९२ | ५७.५ |
| जवळपास तेवढेच उत्पादन मिळते | ३७ | २३.१ | ५५ | ३४.४ |
| **एकूण** | **१६०** | **१००.०** | **१६०** | **१००.०** |
| मध्यमान | १.९८ | | २.२६ | |
| मानक विचलन | ०.३४४८९ | | ०.५२३९४ | |
| Z मूल्य | -५.७९७६ | | | |
| P मूल्य | ०.०००(<०.०५) | | | |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील पिक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांचा कालांतराने कृषिउत्पादनात वाढ किंवा घट होण्यासंबंधीप्रतिसाद दर्शविण्यात आला आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील पिक विमा लाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान ५१.३% शेतकऱ्यांच्या मते कालांतराने कृषिउत्पादनात घट झाली असून २५.६% शेतकऱ्यांच्या मते कालांतराने कृषिउत्पादनात वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे २३.१% शेतकऱ्यांच्या मते कालांतराने कृषिउत्पादनात जवळपास तेवढेच उत्पादन मिळते.

तसेच सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील पिक विमा बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान ५७.५% शेतकऱ्यांच्या मते कालांतराने कृषिउत्पादनात घट झाली असून ३४.४% शेतकऱ्यांच्या मते कालांतराने कृषिउत्पादनात जवळपास तेवढेच उत्पादन मिळते. त्याचप्रमाणे ८.१% शेतकऱ्यांच्या मते कालांतराने कृषिउत्पादनात वाढ झाली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील पिक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांची z चाचणीच्या मदतीने कालांतराने कृषिउत्पादनात वाढ किंवा घट होण्यासंबंधीशेतकऱ्यांचा प्रतिसादानुसार तुलना केली असता पिक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z= -५.७९७६; P<०.०५) फरक आहे.

**सारणी क्रमांक २ : यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांचा कालांतराने कृषि उत्पादनात वाढ होण्याच्या कारणांसंबंधीप्रतिसाद**

| कारणे | लाभार्थी शेतकरी | | बिनलाभार्थी शेतकरी | | Z मूल्य | P मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | | |
| अद्ययावत कृषि पद्धती | ३२ | ७८.० | ११ | ८४.६ | १.५०० | ०.१३ (NS) |
| खतांची सुधारित गुणवत्ता | २४ | ५८.५ | ९ | ६९.२ | २.००० | ०.०४६४(<०.०५) |
| सुधारित बी-बियाणे | ३६ | ८७.८ | ७ | ५३.८ | ६.७०० | <०.०००१ |
| शासकीय माध्यमांद्वारे योग्य मार्गदर्शन | १९ | ४६.३ | ६ | ४६.२ | ०.०१२ | ०.९८५७ (NS) |
| आधुनिक अवजारांचा वापर | ३१ | ७५.६ | १० | ७६.९ | ०.३०१ | ०.७८४७ (NS) |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांचा कालांतराने कृषि उत्पादनात वाढ किंवा घट होण्यासंबंधीप्रतिसाद दर्शविण्यात आला आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा लाभार्थी शेतकऱ्यां दरम्यान ८७.८% शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात सुधारित बी-बियाणामुळे वाढ झाली असून ७८.०% शेतकऱ्यांच्या उत्पादनात अद्ययावत कृषि पद्धतीमुळे वाढ झाली आहे. तसेच ७५.६% शेतकऱ्यांच्या उत्पादनात आधुनिक अवजारांचा वापर केल्यामुळे वाढ झाली असून खताच्या सुधारित गुणवत्तेमुळे वशासकीय माध्यमांद्वारे योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे उत्पादनात वाढ झाली हे नमूद करणाऱ्या शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे५८.५% व ४६.३% आहे.

तसेच सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा बिनलाभार्थी शेतकऱ्यां दरम्यान ८४.६% शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात अद्ययावत कृषि पद्धतीमुळे वाढ झाली असून७६.९% शेतकऱ्यांच्या उत्पादनात आधुनिक अवजारांचा वापर केल्यामुळे वाढ झाली आहे. तसेच ६९.२% शेतकऱ्यांच्या उत्पादनात खताच्या सुधारित गुणवत्तेमुळे वाढ झाली असून सुधारितबी-बियाणामुळे व शासकीय माध्यमांद्वारे योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे उत्पादनात वाढ झाली हे नमूद करणाऱ्या शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ५३.८% व ४६.२% आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांची z चाचणीच्या मदतीने अद्ययावत कृषि पद्धतीनुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक(Z= १.५०० ; P=<०.१३ (NS)) फरक नाही, तसेच खतांची सुधारित गुणवत्तेनुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z=२.०००; P <०.०५)) फरक आहे. सुधारित बी-बियाणानुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z=६.७००; P = <०.०००१) फरक आहे, शासकीय माध्यमांद्वारे योग्य मार्गदर्शन याची तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z=०.०१२; P = ०.९८५७ (NS)) फरक नाही, आधुनिक अवजारांचा वापरानुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक(Z=०.३०१; P = ०.७८४७ (NS)) फरक नाही.

**सारणी क्रमांक ३: यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांचा कालांतराने कृषि उत्पादनात घट होण्याच्या कारणांसंबंधीप्रतिसाद**

| कारणे | लाभार्थी शेतकरी | | बिनलाभार्थी शेतकरी | | Z मूल्य | P मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | | |
| जमिनीची पत कमी झाली | ७८ | ९५.१ | ८२ | ८९.१ | २.१२ | ०.०४६६ (<०.०५) |
| किटकांचा प्रादुर्भाव वाढला | ५९ | ७२.० | ६२ | ६७.४ | ०.९ | ०.३७०६ (NS) |
| नैसर्गिक आपत्ति (ओला किंवा कोरडा दुष्काळ) | ८२ | १००.० | ९१ | ९८.९ | १.३ | ०.१८३४ (NS) |
| नैसर्गिक हवामान चक्रात बदल | ६४ | ७८.० | ७२ | ७८.३ | ०.१ | ०.९४८२ (NS) |
| शासकीय कृषियंत्रणेकडून असहयोग | ५३ | ६४.६ | ७१ | ७७.२ | २.५ | ०.०१३१ (<०.०५) |

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांचा कालांतराने कृषि उत्पादनात घट होण्याच्या कारणांसंबंधीप्रतिसाद दर्शविण्यात आला आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील पीक

विमा लाभार्थी शेतकऱ्यां दरम्यान १००.०% शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात नैसर्गिक आपत्तिमुळे (ओला किंवा कोरडा दुष्काळ) घट झाली असून ९५.१% शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादनात जमिनीची पत कमी झाल्यामुळे घट झाली आहे. तसेच ७८.०% शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात नैसर्गिक हवामान चक्रात बदल झाल्यामुळे घट झाली असून किटकांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे व शासकीय कृषियंत्रणेकडून असहयोगामुळे कृषी उत्पादनात घट झाली हे नमूद करणाऱ्या शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे७२.२% व ६४.६% आहे.

तसेच सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा बिनलाभार्थी शेतकऱ्यां दरम्यान ९८.९.०% शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात नैसर्गिक आपत्तिमुळे (ओला किंवा कोरडा दुष्काळ) घट झाली असून ८९.११% शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादनात जमिनीची पत कमी झाल्यामुळे घट झाली आहे. तसेच ७८.३% शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात नैसर्गिक हवामान चक्रात बदल झाल्यामुळे घट झाली असून शासकीय कृषियंत्रणेकडून असहयोगामुळे व किटकांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे कृषी उत्पादनात घट झाली हे नमूद करणाऱ्या शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे७७.२% व ६७.४% आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांची z चाचणीच्या मदतीने जमिनीची पत कमी झाल्यामुळे कालांतराने कृषि उत्पादनात घट होण्याच्या कारणानुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z= २.१२ ; P<०.०५) फरक आहे. किटकांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळेकृषि उत्पादनात घट होण्याच्या कारणानुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z=०.९; P=०.३७०६ (NS)) फरक नाही. नैसर्गिक आपत्तिमुळे (ओला किंवा कोरडा दुष्काळ) कृषि उत्पादनात घट होण्याच्या कारणानुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z=१.३; P=०.१८३४(NS)) फरक नाही. नैसर्गिक हवामान चक्रात बदलामुळे कृषि उत्पादनात घट होण्याच्या कारणानुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z=०.१; P=०.९४८२(NS)) फरक नाही. शासकीय कृषियंत्रणेकडून असहयोगामुळे कृषि उत्पादनात घट होण्याच्या कारणानुसार तुलना केली असता पीक विमा लाभार्थी व बिनलाभार्थी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Z=२.५; P=०.०१३१ फरक आहे.

## निकर्ष

उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते कालांतराने कृषिउत्पादनात घट झालेल्या व जवळपास तेवढेच उत्पादन घेणाऱ्या पिक विमा लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रमाण बिनलाभार्थी शेतकऱ्यांच्या तुलनेत सार्थकरीत्या कमी आहे कालांतराने कृषि उत्पादनात वाढ होण्याचे कारण सुधारित बी-बियाणे, अद्ययावत कृषि पद्धती, खतांची सुधारित गुणवत्ता व आधुनिक अवजारांचा वापर आहेत. कृषि उत्पादनात घट होण्याचे कारण नैसर्गिक आपत्ति (ओला किंवा कोरडा दुष्काळ), जमिनीची पत कमी होणे, नैसर्गिक हवामान चक्रात बदल, शासकीय कृषियंत्रणेकडून असहयोग व किटकांचा प्रादुर्भाव ही आहेत.

## संदर्भ सूची


1) इंडिया १९९९, प्रकाशान विभाग, सूचना एवं प्रसारण मंत्रालय भारत सरकार पृष्ठ क्र २७३
2) कऱ्हाडे, बी. एम., 'शास्त्रीय संशोधन पद्धती', (२०११), पिंपळापूरे ॲन्ड कं पब्लिशर, नागपूर,
3) कुमार, एल. एस. एस. भारतातील शेती, नागपूर, १९६६.
4) कुलकर्णी, दिगंबर, सुलभ शेतीशास्त्र आणि व्यवसाय, पुणे, १९५९.
5) चौधरी, रा. मो. शेतीची मूलतत्वे, पुणे, १९६२.
6) जिल्हा समाजिक आर्थिक समालोचन, अकोला जिल्हा, २०१४.
7) जिल्हा समाजिक आर्थिक समालोचन, अमरावती जिल्हा, २०१३
8) जिल्हा समाजिक आर्थिक समालोचन, बुलडाणा जिल्हा, २०१४.
9) जिल्हा समाजिक आर्थिक समालोचन, यवतमाळ जिल्हा, २०१४.
10) जिल्हा समाजिक आर्थिक समालोचन, वाशिम जिल्हा, २०१४.
11) डॉ. जे. पी. मिश्रा, "कृषी उत्पादन में जोखिम एवं अनिश्चितता", कृषी अर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन, पृष्ठ क्र. ३१९, वर्ष २००३
12) तेली, तु. ग. अभिनव शेतीशास्त्र, पुणे, १९६५.
13) देसाई, श्री. मु, भालेराव नि, कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेतीव्यवसाय, निराली प्रकाशन,

14) बोधनकर, सु., अलोणी, वि. व कुलकर्णी, मृ., 'सामाजिक संशोधन पध्दती', (१९९३), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती.
15) भगवती पांडे, " मौजूदा कृषी विकास योजनाओं का मूल्यांकन कुरुक्षेत्र, पृष्ठ क्र. ०८, वर्ष २००९.)
16) भांडारकर, पु. ल., 'सामाजिक संशोधनपद्धती' (१९७६), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ (दत्तराज प्रकाशन), नागपुर.
17) भारतीय अर्थव्यवस्था विकास एवं आयोजन
18) भुजबळ, भी. गो. नैसर्गिक शेती, पुणे.१९९१.
19) मुलाणी. एम. यू., लोहोकरे रोहिदास, महाराष्ट्रातील शेती, डायमंड पब्लिकेशन्स, २००९-१०.
20) मेधा कानेटकर, भारतीय अर्थशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर-१२.
21) राष्ट्रीय कृषी निती २०००